


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# 'राब' कथासंग्रहाचा वाङ्मयीन अभ्यास

**श्रध्दा धनराज बारबुद्धे**
विद्यार्थी,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान स्वायत्त संस्था अमरावती.

संजय लोहकरे हे आदिवासी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांचा 'राब' हा कथासंग्रह ९ ऑगस्ट २०१८ साली प्रसिद्ध झाला आहे. अथर्व पब्लिकेशन, जळगाव यांनी हा कथासंग्रह प्रसिद्ध केला आहे. या कथासंग्रहामध्ये एकूण १५ कथांचा समावेश आहे. असा एकूण १३६ पृष्ठांचा हा कथासंग्रह असून त्याचे मूल्य १७५/- इतके आहे. हा संपूर्ण कथासंग्रह डांगाणी बोलीभाषेत लिहिलेला असल्यामुळे या कथासंग्रहाचे भाषिक सौंदर्य काही वेगळेच असल्याचे दिसून येते. प्रस्तुत कथासंग्रहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश बडवे यांची प्रस्तावना लाभली आहे.

या कथासंग्रहात प्रादेशिकतेचे सिमोल्लंघन झाले आहे. चाळीसगाव डांगाण, सातपुडा पर्वतरांगांतील मेळघाट आणि ठाणे जिल्ह्याचा प्रदेश ही या कथासंग्रहाची प्रादेशिकता आहे.[1] मराठी साहित्यात कथा या वाङ्मय प्रकाराला महत्त्वाचे स्थान आहे. 'एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्पर संबंधातून घडलेल्या घटनांचे एका दृष्टिकोनातून केलेले चित्रण म्हणजे लघुकथा' अशी एक व्याख्या मराठी विश्वकोश, खंड 3 मध्ये करण्यात आली आहे. तसेच 'कमीत कमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रितीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच ठसा उमटविणारी हकीकत म्हणने लघुकथा होय. 'अशी व्याख्या ना. सी. फडके यांनी केली आहे.[2]

आदिवासींच्या एकूणच नव्वदोत्तर मराठी कथेतून काही महत्त्वाचे निष्कर्ष मांडता येतील. निसर्ग हा आदिवासी कथेचा केंद्रबिंदू, तर पर्यावरणीय, मानवतावादी भूतदयावादी जाणीवा हे आशयकेंद्र आहे. योजनारहित जीवन हा गाभा. जीवनाला आलेला

एकाकीपणा कथेत जाणवत नाही.' या कथा म्हणजे आदिवासींची प्रतिसृष्टी आहे. या कथांतील बोली, प्रतीके, मिथके, जीवनजाणिवा, प्रस्थापित कथेहून वेगळ्या आहेत. रचनातंत्र, निवेदनपद्धती, पात्रयोजना आणि एकूणच कथेचा आकृतीबंध प्रस्थापित कथेसारखाच आहे. खरे तर, आदिवासी कथा ही प्रस्थापित कथेहून निराळी असायला हवी.[3] जी. ए. कुलकर्णी, यांच्या मते, 'जीवनाचे अधिक भेदक, सूक्ष्म, प्रत्ययकारी आणि विविध पातळ्यांवरून जर दर्शन घडवायचे असेल, माणसाच्या मनाचे चित्र गोचर करायचे असेल, माणसामाणसातील संबंधाची, व्यक्तिजीवन व माणसाचे समाजजीवन यांचे दर्शन घडवायचे असेल तर कथेचे अंतर्बाह्य रूप बदलले पाहिजे.'[4]

'राब' या कथासंग्रहातून लेखकाने आदिवासी समाजाचे भावविश्व रेखाटले आहे. आदिवासी समाजाचे कृषिविषयक जीवन, निसर्गसौंदर्य, राजकारण, आदिवासींचे समूहजीवन, कलाविषयक जीवन, आदिवासी स्त्रियांचे स्वातंत्र्य, कुपोषण तसेच तेथील सणोत्सव आणि त्यानुसार येणार पुजाविधी या सर्वांचे वर्णन प्रस्तुत कथासंग्रहात आलेले आहे. संजय लोहकरे यांच्या काही कथा आकाराने लहान आहेत. तरी त्या कथांमधून व्यक्त होणारा आशय हा आदिवासींच्या जगण्याचे प्रतिबिंब व्यक्त करणारा आहे. आदिवासींच्या जगण्यात समूहजीवनाला विशेष महत्त्व असल्याचे या कथांमधून आपल्याला दिसून येते. तसेच आदिवासींची बदलत जाणारी जीवनशैलीचे दर्शन आपल्याला या कथांमधून घडते.

'राब' कथासंग्रहाचा वाङ्मयीनदृष्ट्या चिकित्सक अभ्यास करताना आपण खालील मुद्यांचा आधार घेऊन त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न येथे केला गेला आहे.

१. 'राब' कथासंग्रहातील निसर्गजाणीव

२. 'राब' कथासंग्रहातील राजकीय वातावरण

३. 'राब' कथासंग्रहातील कृषीजीवन

४. 'राब' कथासंग्रहातील भाषासौंदर्य

## १. 'राब' कथासंग्रहातील निसर्गजाणीव :

संजय लोहकरे यांच्या 'राब' या कथासंग्रहातील कथांमधून निसर्गाचे अप्रतिम सौंदर्य शब्दरूपाने रेखाटले गेलेले आहे. या कथासंग्रहातील जवळपास सर्वच कथांमध्ये निसर्गाचे वर्णन आलेले आहे. आदिवासी समाजाचा निसर्गाशी असलेला निकटचा संबंध आपल्याला त्यातून प्रकर्षाने दिसून येतो. लेखकाची लेखनशैली ही चित्रदर्शी असल्यामुळे कथा वाचतानाच संपूर्ण निसर्गसृष्टी डोळ्यासमोर उभी आहे असे वाटते.

कथासंग्रहातील काही कथांमधून आदिवासींना निसर्गाची असलेली जाणीव आपल्याला उत्कटतेने दिसून येते. या कथासंग्रहातील 'राब' या कथेमधून शेतातील ‘ऐलापैलाची झाडे’ तोडतानाही त्यांच्यावर माया लावणारा आदिवासी समाज आपल्याला दिसून येतो. या ‘ऐलापैलाची झाडे’ तोडण्याला येथे 'राबणी' करणे असे म्हटले आहे. ती राबणी करताना त्या कथेतील हाणम्या, झाडांना आधी गूळ भाताचा नैवेद्य दाखवून त्या झाडांच्या पाया पडतो व नंतरच त्या झाडांची कापणी करतो. यावरून त्यांच्या मनात असलेला निसर्गाविषयीचा अतोनात आदरही आपल्याला दिसून येतो.

निसर्गाला जपणे म्हणजेच त्याविषयी आपल्याला असलेली जाण होय. अशी जाणीव आदिवासींच्या जगण्याच्या पद्धतीतून आपल्याला आलेली दिसते. 'आवणी' या कथेतून आपल्यासोबत कीड्या, मुंग्यांचा विचारही आपण केला पाहिजे, त्यांच्याशिवाय माणसाच्या जगण्याला शोभाच नाही, असा दृष्टिकोन या कथेतील आज्याचा आपल्याला दिसून येतो. या कथेतील आज्या आवणीच्या वेळेला पोरींना सतत हटकत राहायचा "ये पोरीवं, परतेक चुडाला दोन काड्या जास्त खोचीत जा बराका....."

निसर्गातील प्राणी, झाडे, वेली यांना जगवले तरच माणसाच्या जगण्याला काहीतरी अर्थ आहे. 'जीतराब' या कथेतून श्रावणात खेकडीं का खायची नाही याची सुंदर संकल्पना या कथेतील आज्याच्या तोंडून व्यक्त झालेली आहे. या कथेतील मुलांनी जेव्हा आज्यानी इतकं सांगूनही खेकडी पकडून खाल्ली, तेव्हा हीच मुले आज्याला विचारतात की,

श्रावणात खेकडी खाल्ल्यानी पाप होते का ? तेव्हा आज्या सांगतो , की कहृयाचा पापन् कहृयाचा पुण्य? समदा खोटाय. बाळाओ, सरवानात खेकडी खाल्यावं पाप होत नही, सरावनात खेकडी पिला काढीत्यात. खेकडीच्या पोटात पकी ऐंशी - नव्वद पिला रहेत्यात. आन् ती याकदा का वढ्यात सोडली का कशी मज्यात खेळत्यात. मंग खेकडय मोकळी आन् पिलाय वाढंत्यात. आन् मंग भादयापासून पुढं वरीसभर खेकडी धरल्या तरी त्यांचा वसबूड व्हत नही."

## २. 'राब' कथासंग्रहातील राजकीय वातावरण :

कथा ही मुळातच फुलवत जाण्याचा एक प्रकार असतो. कथेतील पात्रांमुळे कथेला एक विशिष्ट सौंदर्य प्राप्त होते असते. तसेच कथेतील पात्रे ही एकमेकांत गुंतलेली असतात. कथेचे एक आशयकेंद्र असते. 'राब' या कथासंग्रहात लेखकांनी प्रत्येक कथेचे एक वेगळे आशयकेंद्र सूचित करण्याऱ्या कथा यांत समाविष्ट आहेत.

राजकारण हा आताच्या काळातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे आणि तो आदिवासींच्या जगण्याला कसा होरपळून काढतो याचे वर्णन 'राब' या कथेत, तसेच 'सेटलमेंट' या कथेतही आल्याचे दिसून येते. 'राब' या कथेतून धरणग्रस्तांच्या जीवनाची गाथाच एक प्रकारे व्यक्त झाल्याचे दिसून येते. या कथेतून मोर्चा, सरकारी अधिकाऱ्याच्या घरी चर्चा, हातात टेकवलेल पैशाचं पाकिट, बारा वाड्यांच्या आदिवासींना वाड्या खाली करण्याची आलेली नोटीस, पाटील, सरपंचांनी दिलेला धोका असे नवे संदर्भ या कथेतून पुढे येतात.[5] वाडीवरची माणसे, त्यांची हतबलता, सत्ताधाऱ्यांनी वाचवलेली त्यांची धरणात जाणारी जमीन, हे सारं समजल्यानंतर आदिवासींची होणारी घालमेल हानम्याच्या तोंडून व्यक्त होते. "राबणी करताना रानात आपून ऐलापैलाची झाडा तोडीतो. तेंचा किड्या मुंग्यान्ला, पाखरा

भ्याकराली उपेग नस्तो. तशी आपून इथं ऐलापैलाची झाडा हावोत. आपला कोणालीच उपेग नही. म्हणून इथल्या सरकारनं आपलेली तोडला बिनधास आन् आपला राब घातला. त्या शिरिमंतांच्या बागा फुलाया. आपल्या राबावं तेंची शेती आन् त्यांचा राजकारण चालल इथून पुढं. कहयाचा काय आन् कहयाचा काय, आपल्यासारकी सगळी माणसा या धरतुरीवं ऐलापैलाची झाडा व्हत्यात . कोणीय ताँडावान तेंचा राब घालावा." (पृष्ठ २८)

सेटलमेंट' सारखी कथा विकृत राजकारण व त्याचा अदिवासींवर होणारा परिणाम सूचित करणारी आहे. स्थानिक आमदार आणि दौल्या पुढाऱ्याचं राजकारण डोंगरदऱ्यांशी नातं असणाऱ्या आदिवासीचे जीवन उद्‌धवस्त करण्याचाच प्रयत्न करतात. सामान्य माणसांशीच हा खेळ खेळला जातो. भ्रष्ट व्यवहार आणि सुधारणांसाठीचे नाटक करणारे राजकारणी यांचा जाच आदिवासींना सहन करण्याशिवाय पर्याय राहत नाही. जगण्या - मरण्याच्या संघर्षाला तोंड देत आदिवासी माणसं कशी जगत आहेत यांचे चित्रण या कथेतून प्रकर्षाने जाणवते.

### ३.'राब' कथासंग्रहातील कृषीजीवन :

संजय लोहकरे यांचा हा कथासंग्रह एका वेगळ्या अनुभवविश्वाचे दर्शन घडविणारा आहे. आजच्या आधुनिक काळातील 'स्व' केंद्री समाजातील माणसांच्या जगात बाजारू, मूल्यविहिन चंगळवादी जीवन जगणारा समाज, तर दुसऱ्या बाजूला आदिवासी संस्कृतीतील मानवतावादी, उदारमतवादी दृष्टिकोन यांतील विरोधाभास जाणवल्यावाचून राहत नाही. निसर्गावर जीव ओवाळून टाकणाऱ्या, माणसाला माणूस म्हणून जगवणारा, मुके प्राणी, पशुपक्षी, शेतीवर अफाट प्रेम असणारा ,जीवजीवाणू यांना माया लावणारा, डोंगरदऱ्या, कड्याकपारी यांच्या सहवासात सुखाने जगणारा, आदिवासी संस्कृती जपणारा हा आदिवासी जनसमूह आहे असे मत लेखकाने एकूण आदीवासी कथेबद्दल मांडले आहे.[6]

आदिवासी समाज हा पिढ्यान् पिढ्या निसर्गाच्या सान्निध्यात राहात आहे. जंगलातील पशु-पक्षी प्राणी यांच्याशी त्यांचा नित्य संबंध येत असतो. शेतीविषयक बऱ्याच लहानसहान जुन्या गोष्टींचा खजिना त्यांच्याकडे आहे. 'राब' कथासंग्रहातील 'आवणी', 'कनसरी', शिनगाराची पटी' या कथेतून आपल्याला त्याचा परिचय देता येतो. 'आवणी' या कथेतील आजा शेतातील पिकांना रासायनिक खत मारायला विरोध करतो, कारण शेतातील पीक आणि सजीवसृष्टीवर त्याचा विघातक परिणाम होईल याविषयीचा दूरदृष्टिकोन आज्याजवळ आहे. म्हणून तो त्याच्या मुलाला म्हणजे तुक्याला आपल्या शेतातील पिकांना युरिया खत मारला म्हणून रागावतो आणि याचे दुष्परिणाम काय होतील ते तो समजावून सांगतो की, ".....आरं, श्यातात घाम गाळून, मेहनत करून, गुरा वासरा पहून भात पिकवायचा, म्हंजी त्या कष्टाचा लय दिवस पुराताय आन् फुकाटचा भुस्काटासारखा उडून जाताय" (पृष्ठ ३१)

## ४. 'राब' कथासंग्रहातील भाषासौंदर्य :

भाषा ही मानवाला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. भाषेशिवाय माणूस आपल्या मनातील भावना, विचार व्यक्त करू शकत नाही. भाषा ही मानवी जीवनात खूप महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहे. हीच भाषा जेव्हा एखादी बोली म्हणून वेगळ्या पध्दतीने आपल्या समोर येते तेव्हा तिला एक विशिष्ट प्रकारचे सौंदर्य प्राप्त झालेले असते. संजय लोहकरे यांची लेखनशैली चित्रदर्शी आहे. शिवाय बोलीभाषेलाच लिखित रूपात वाचताना त्या बोलीचा लहेजा लक्षात येतो. कोणतीही बोली, तिच्यातील शब्दप्रयोग, वाक्प्रचार, म्हणी, शिव्या, उखाणे हे सर्व भाषिक प्रयोग तिचे सौंदर्य उलगडत असतात. बोली या गाव, समाज, निसर्ग, शेती, कृती आणि जगण्याच्या तऱ्हांतून अधिक समृद्ध झालेल्या असतात. म्हणूनच बोलींची पाळेमुळे समाज जीवनात अधिक खोल रुतलेली दिसतात. [7]

स्त्रीला दागदागिन्यांनी जसे सौंदर्य प्राप्त होते तसेच सौंदर्य आपल्या वेगवेगळ्या बोलीभाषेचे आहे. संजय लोहकरे यांच्या 'राब' कथासंग्रहातील भाषिक सौंदर्य हा एक महत्त्वपूर्ण मुद्दा आहे. डांगाणी परिसरातील बोलीचे उपयोजन करून या कथा लिहिल्या असल्याने बोलीचे अंगभूत असणारे सौंदर्य या कथांमधून बघता येते. ही बोली ग्रामीणतेशी निगडीत असणारी बोली असून जिव्हाळा, प्रेम, आपुलकीने ओतप्रोत भरलेली ही बोली आहे. याचा प्रत्यय आपल्याला कथासंग्रहातील प्रत्येक कथा वाचताना येतोच. या बोलीचे काही शब्द हे ग्रामीण मराठीतही रुळलेले आहेत. पण काही शब्द हे अस्सल बोलीतलेच असल्याने वाचताक्षणीच समजत नाहीत. काही विशिष्ट संकल्पना आहेत. त्या समजल्या की, कथेचा आशय अधिक चांगल्या पध्दतीने उलगडत जातो .

या कथासंग्रहातील संवाद, वाक्प्रचार, लोकगीते, शब्दबंध सर्वच अगदी डांगाणी बोलीतून आल्याचे आपल्याला दिसून येते. त्यामुळे या कथासंग्रहाला एक उच्च प्रतीचे भाषिक सौंदर्य प्राप्त झालेले आहे. 'गायखा' या कथेत तुक्याच्या तोंडून येणारे गाणे, जनीच्या तोंडून येणारे गाणे हेही प्रस्तुत बोलीतूनच आल्यामुळे कथा वाचताना त्यात आणखीनच रस येतो. 'तमाशा' या कथेतील लावणीसुध्दा याच भाषेतून भाल्यामुळे कथेला एक विशिष्ट सौंदर्य प्राप्त झाल्याचे दिसून येते. 'भगत' या कथेतून आलेले लोकगीतही याचीच प्रचिती देते.'भगत' या कथेत घोरपड्या आईच्या देवळात मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याच्या निमित्ताने परंपरागत लोकगीतांचा वापर त्यांनी केलेला दिसून येतो. लोकपरंपरा आणि मानवतावादी विचारांची मांडणी त्यातून आपल्याला प्रकर्षाने जाणवते. आदिवासी 'भगत' आणि शहरातून आमदाराने आणलेला 'बामण ' यांच्यातील संघर्ष येथे उभा केलेला भाहे. निमित्त होळीचे अथवा पूजेचे असले तरी या लोकगीतातून एक वेगळाच संदेश आपल्याला मिळतो. भटजी तोंडातल्या तोंडात मंत्र म्हणतो ते आपल्याला कळत नाही. ज्याला आपण काय पुटपुटतो काय म्हणतो ते समजत नाही. भगत सुध्दा असेच पुटपुटत असतो. त्यावर किसन मास्तर भगताला 'तू काय म्हतोय' असे विचारल्यावर त्याचे पुटपुटणे तो बोलून दाखवतो.

भाताचा चूड जगू दे

खाचरा चोंड्यात खेकडी मास खेळू दे

मूठभर रोपाचं खंडीभर दाणं पिकू दे

कणगी कोथळ्या भरू दे

वाटून तिटून खाऊं दे

किड्या मुंग्या जगू दे

भलर बिलर व्हऊ दे

माणसातला माणूसपण टिकू दे

आन ढोलाच्या तालावं

आाखा डांगाण याका रिंगणात नाचू दे

नाचता नाचना हासू दे

धरतुरीचान् मायचा प्वाट पिकू दे

जग सुखी त आपून सुखी

आसा समदेली रातन दिन वाटू दे..

या कथासंग्रहातील सर्वच कथा डांगाणी बोलीतच मांडल्या गेल्याने त्या प्रवाही पध्दतीने व्यक्त होतात. शब्दांचा खळाळता ओघ यातून पुढे येतो.त्यांतील काही निवडक शब्द, संकल्पना अशा आहेत.

कोंबडझिऱ्या - पाणी न आटणारे ठिकाण

कुरकुला - टोपलं

उजुक - अजून, आणखी

आवणी - भाताची लावणी

पका - खूप, पुष्कळ

गरवणी - खेकडी पकडण्याची वेळ

आसीनवार - अश्विन महिना

गोमतार - गोमूत्र

वरागनी - वर्गणी

परचार - प्रचार

याटाळणी - कापणी करणे

मेंड - बांध

महालदेश - इगतपूरी ते त्र्यंबकेश्वर हा परिसर

आवाय - बातमी

कारवी - झाडाचे नाव

मोड्याचा दिवस - शेतात काम न करण्याचा दिवस

इवायनाचा - विमानाचा

वजबूड होणे- वंश नष्ट होणे

अशाप्रकारे संजय लोहकरे यांच्या राब कथासंग्रहाचा वाङ्मयीनदृष्ट्या काही कथांचा आधार घेऊन अभ्यास करण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष:**

१.' राब' हा संपूर्ण कथासंग्रह डांगाणी या वैशिष्ट्यपूर्ण बोलीत आहे.

२. 'राब' या कथासंग्रहातून आदिवासींचा जीवन जगण्याचा संघर्ष प्रकर्षाने जाणवतो

3. 'राब' या कथासंग्रहातून आदिवासींची शेतीविषयी असलेली आत्मीयता आपल्याला दिसून येते.

४. 'राब' या कथासंग्रहातून आदिवासींची राजकारणातून होत असलेली पिळवणूक आपल्याला दिसून येते.

५. 'राब' या कथासंग्रहातून आदिवासींना निसर्गाविषयी असलेली जाणीव तसेच निसर्गावर असलेले त्यांचे अतोनात प्रेम या कथांमधून दिसून येते.

**संदर्भ:**

१) फडकी (मासिक), १५ फेब्रुवारी, 2022, प्रा. यशवंत ढवळा, भांडकोळी.

२) संपादक: डॉ. शिरिष लांडगे, डॉ. दिलीप पवार, डॉ. संदीप सांगळे (२०१९), समकालीन मराठी कथा, पुणे : अक्षरबंध प्रकाशन.

३) लोहकरे  संजय, चळवळ आणि साहित्य, मेघा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, प्र.आ.2023.

४) कुल्ली स.त्र्यं, जि.ए.जीवनदृष्टी आणि प्रतिमासृष्टी, विजय प्रकाशन,नागपूर, प्र.आ.१९९४.

५) लोहकरे संजय, राब, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, प्र.आ. ९ ऑगस्ट २०१८.

६) तत्रैव, पृष्ठ क्र. १८

७) फडकी (मासिक), १५ ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ राब- आदिवासींची रानखबर, प्रा. यशवंत भांडकोळी.

८) उनि  : लोहकरे संजय, राब.

९) लोहकरे संजय, निवडक प्रस्तावना,  मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, प्र.आ.2023.